# शबरी कुंभ
## प्रमोद कुलकर्णी

कुंभमेळा ही हिंदू समाजाची सांस्कृतिक परंपरा आहे. या निमित्ताने सर्व समाज एकत्र येतो. साधुसंतांच्या मार्गदर्शनातून नवीन चैतन्य घेऊन आपापल्या गावी परत जातो ते पुढील वाटचाल धर्मनिष्ठेने करण्याचा संकल्प घेऊन.

दि. ११, १२, १३ फेब्रुवारी २००६, माघ पौर्णिमा विक्रमा संवत २०५२ हा संपन्न होणाऱ्या श्री शबरी कुंभामध्ये देशातील लाखो वनवासी बंधू-भगिनी सहभागी होतील. वनवासींबरोबरच शहरवासीही मोठ्या संख्येने येतील आमि धर्मजागरण-धर्मरक्षेचा संदेश घेऊन आपापल्या गावी परततील. गेल्या काही वर्षांपासून धर्मांतराच्या माध्यमातून अशिक्षित व भोळ्या वनवासींना विविध प्रलोभने दाखवून धर्मांतरीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. इंग्रजांच्या कारकिर्दीत तर ह्या कारवायांना राजाश्रयच मिळाला होता. ईशान्य भारतातील राज्यांमधील सशस्त्र कुटीर कारवाया त्याच उपद्व्यापांचे फलीत आहे. एवढेच काय बिहार, ओरिसा, पश्चिमबंगाल, झारखंड, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, आंध्रप३देश, महाराष्ट्र अशा विविध राज्यांमधील वनवासी भागातील सशस्त्र कारवायांचा थेट संपर्क ह्या धर्मांतर घडवून आणणाऱ्या शक्तींशी आहे. हे अनेक वेळेला सिद्धही झाले आहे. धर्मांतराच्या मुळाशी वनवासींचे अज्ञान व अंधश्रद्धा हे जसे एक कारण आहे. त्याचबरोबर त्यांचे पराकोटीचे दारिद्र्य व त्याचा गैरफायदा घेणारा अन्य समाज हेही एक कारण आहे हे विसरुन चालणार नाही. शिक्षणाच्या व्यापक प्रसारामुळे खेड्यापाड्यातील, दुर्गम पाड्यातील वनवासी आता शिकू लागला आहे. तरीही अनेक जमातींमधील वनवासींची पहिली पिढी आता कोठे शिकायला लागली हेही एक धगधगीत वास्तव आहे. असे वनवासी बांधव सध्याच्या बदलत्या काळामध्ये स्वतःची उपजीविका किती सक्षमपणे करु शकतील हे एक प्रश्नचिन्हच आहे. गणित इंग्रजी शिक्षणाच्या मर्यादा व त्यामुळे स्वाभाविकच येणाऱ्या पुढील शिक्षणाचा संधीचा फायदा घेणारे थोडेच जण असतात. शहरी जीवनाचे आकर्षण चित्रपट, ट्.ज. सारख्या माध्यमातून पाहिलेल्या चकाकणाऱ्या-कृत्रिम जीवनाची खोटी चित्रणं पाहणारा वनवासी बांधव आपले कुटुंब, घर, पाडा व परिसर ह्यापासून मनाने केव्हाच तुटलेला असतो. न घर का न घाट का अशी त्याची अवस्था झालेली असते. नोकरीच्या शोधात फिरणाऱ्या अल्प-अर्धशिक्षित वनवासी बांधवांचे तांडे शहरामध्ये मिळणाऱ्या कुठल्याही मोलमजुरीच्या कामावर आपला उदरनिर्वाह करताना दिसतात. जंगलातील अफाट नैसर्गिक साधनसामुग्री तुलनेन सहजपणे उपलब्ध असतानाही, त्याच्या नव्या काळानुसार उपयोग करण्याच्या ज्ञानाच्या अभावामुळे वनवासी बांधव आपल्या गावापासून तुटत चालला आहे.

ह्या शबरी कुंभामध्ये येणाऱ्या वनवासी बांधवांना परिसरातीलच साधन सामुग्री वापरुन स्वावलंबी बनण्याचा मूलमंत्र देणाऱ्या उद्योगांचे दर्शन होईल. बांबू उद्योग, प्रक्रियाउद्योग, बायोगॅस, बयोडिझेल (जैव इंधन), मधुमक्षिका पालन, सुधारित शेती, जलसंधारण व जलव्यवस्थापन, गालिचे उद्योग, वनौषधी, विणकाम, सौर उर्जा अशा अनेकविध उद्योगांच्या जिवंत प्रतिकृती प्रदर्शनाच्या 'स्वावलंबन' ह्या विभागामध्ये उभ्या केल्या जाणार आहेत.

विदर्भातील मेळघाटमधील लवादा गावी स्थानिक कोरकू समाजाला संघटित करून त्यांना बांबूच्या विविध वस्तू, अधुनिक पद्धतीने बनविण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या संपूर्ण बांबू केंद्राचा स्टॉल ह्या प्रदर्शनात असेल. ह्याबरोबरच बांबू उद्योगासाठी उपयोगी पडणारा व I.I.T. मुंबई यांनी विकसीत केलेला हत्यारांचा संच (Tool Kit) चेही प्रात्यक्षिक येथे दाखविले जाईल.

देशी गाईचे मुत्र व शेण यांचा प्रभावी वापर करून शेतीचे उत्पन्न वाढविता येऊ शकते हे एव्हाना विविध चाचण्यांमधून सिद्ध झाले आहे. वनवासी पाड्यांमधून असे गोधन उपलब्ध आहे. नैसर्गिक वातावरणात मनसोक्त भटकणाऱ्या ह्या गायींचे मुत्र तर अधिकच ऐषधी पण आमच्या वनवासी बांधवांना गंधवार्ताही नाही. गोमुत्राचा प्रभावी वापर तसेच शेणापासून गांडुळ खत यांच्या शास्त्रशुद्ध माहितीचे दर्शन गोविज्ञान-अनुसंधान केंद्र-देवळा पार स्टॉल उभे करणार आहे.

पुण्यातील सुयश चॅरिटेबल ट्रस्ट व कल्याण आश्रम यांच्या माध्यमातून देशातील ग्रामविकासाचे काम चालू केले आहे. करंजपासून बायोडिझेल व त्याच्या पेंडीपासून बायोगॅसची निर्मिती ह्याचे यशस्वी तंत्र त्यांनी विकसित केले आहे. नगर जिल्ह्यातील अकाले तालुक्यातील ढगेवाडीतील ह्या दुर्गम भागातील त्यांनी टोमॅटो सॉस, केचप, बचतगट, भातलागवडीचे अधुनिक तंत्र अशा सर्वांगीण विकासाचा मंत्र सांगणारा स्टॉल तिथे उभा असेल.

ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र (Centre of Sciences & Villages) ही वर्ध्यातील ख्यातनाम संस्था गेल्या अनेक वर्षापासून ग्रामीण भागातील सर्वसामान्यांना परवडणारे व समजणारे तंत्रज्ञान विकसित करीत आहे. त्यांनी बनविलेले शीतल पॉट (मातीचा फ्रीज) पाण्याचा घरगुती फिल्टर, हात कागदाच्या विविध वस्तू, शौचालय, शोषखड्डा, नॅजेप, कंपोस्टींग ह्याचे एक स्वतंत्र दर्शन ह्या विभागात आपल्याला घडेल.

जनसेवा फौंडेशन गेल्या काही वर्षांपासून धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील कृषी विकासाच्या विविध माध्यमातून वनवासींच्या मध्ये काम करीत आहे. त्यांनी विकसित केलेले चारसूत्री भात लागवडीची पद्धती ही आता सर्वमान्य झाली आहे. त्याचबरोबरीने साक्री तालुक्यातील बारीपाडा ह्या वनवासी गावाला जंगल संरक्षणाच्या माध्यमातून जगाच्या नकाशावर स्थान मिळवून देण्यामध्ये जनसेवा फौंडेशनचे मोठे योगदान आहे.

शेतीचे सुधारीत प्रयोग तसेच बारीपाडा विकासाची कथा सांगणारा जनसेवा फौंडेशनचा स्टॉलही ह्या प्रदर्शनात आहे.

इंदौर (म. प्रदेश) येथील शिवगंगा अभियान ह्या संस्थेने झाबुआ जिल्ह्यात केलेले जलसंधारणाचे विविध प्रयोग प्रात्यक्षिकासह सादर केले जाणार आहेत.

झाडांवरील किंवा पहाडांवरील आग्यामोहोळाचा मध काढून त्याची विक्री करणे हा अनेक वनवासी बांधवांचा रोजीरोटीचा मार्ग आहे. परंतु चुकीच्या पद्धतीने मध काढल्याने मध खराब होतो व मधमाशा व त्यांचे पोळेही नष्ट होते. असा मध काढताना अपघात होऊन जायबंदी होण्याचे प्रमाणही जास्त आहे. सोप्या पद्धतीने पोळ्याला धक्का न लावता मध काढण्याचे शास्त्र शुद्ध-तंत्र सांगण्याचे श्री गोपाल पालीवाल (सेंटर फॉर दी डेव्हलपमेंट) वर्धा यांचा स्टॉल तिथे असेल. त्याचबरोबर माणगाव, जि. सिंधुदुर्ग येथील डॉ. हेडगेवार स्मृती प्रकल्पाचा अन्न प्रक्रिया उद्योग विषयांवरील, जनकल्याण समिती, पूर्वांचल विकास यांचा पूर्वांचलातील अनोख्या विणकामाचे दर्शन घडविणारा स्टॉल, जनकल्याण समिती सोलापूर यांचा हातमागापासून भिंतीवर लावण्याचे शोभेचे विणकाम (वॉल हँगिंग) बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्याचा स्टॉल, भारतीय विपणन विकास केंद्र (C.B.M.D.) यांचा कच्छमधील पारंपारिक विणकामाचे हस्तकौशल्याच्या स्टॉल यांचेही मनोदारी दर्शन ह्या विभागामध्ये होईल.

आणंद कृषी विद्यापीठ, नवसारी विद्यापीठ ह्यांनीही आपल्याकडील असे उपयुक्त तंत्रज्ञान प्रदर्शनातून मांडण्याची परवानगी दिली असल्यामुळे त्याची तयारी सुरु झाली आहे.

वनौषधींची ओळख व प्रक्रिया उद्योग बायोडिझेल, शेतीव्यवस्थापन व सेंद्रीय शेती यांच्या मांडणी बरोबरच आणंद विद्यामंदिर तसेच गुजरात उर्जा अभिकरण यांचा सौर उर्जेची माहिती देणारा स्टॉल ह्या विभागात उभा असेल.

दीनदयाळ शोध संस्थान आपल्या चित्रकुट मधील ग्रामविकासाच्या विविध विकासाचे दर्शन एका वेगळ्या दालनातून करणार आहे.

कोल्हापूरच्या जनभारती न्यासाने केलेल्या गोआधारीत सेंद्रीय शेती च्या यशस्वी प्रयोगांचे दर्शन माहिती फलक व पत्रकाद्वारे करणार आहेत.

प्रदर्शनीच्या स्वाभीमान विभागात विविध राज्यांमधील विविध जनजातींमधील महापुरुषांच्या पराक्रमांचे सचित्र दर्शन घडविले जाणार आहे. त्याचबरोबर देशातील विविध जनजातींचा इतिहास, सांस्कृतिक परंपरा, वारसा, यांची मांडणीही एका स्वतंत्र दालनात केली जाणार आहे. प्रभु श्रीराम हा तर वनवासींचा प्राण महाशक्तीशाली रावणाचा वध करुन सीतेला लंकेतून आणण्याच्या कामात रामाला सर्वप्रकारे मदत झाली ती वनवासींची, सुग्रीव, हनुमान, जटायु पासून ते सामान्य खारीपर्यंत ह्या वनजीवींनी यथाशक्ती केलेल्या समर्पित सहाय्यामधूनच राक्षसी वृत्तीवरील सत्याचा जय साकार होऊ शकला. ह्या सर्व कथेचे मनोहारी दर्शन घडविणारा रामद्रशन इथे सचित्र उभे केले जाणार आहे. श्रद्धा जागरणाच्या ह्या कामामध्ये खोडे घालणाऱ्या अराष्ट्रीय प्रवृत्तींच्या कामाच्या पद्धतीची माहिती सांगणारा स्टॉलही इथे असेल, त्याच बरोबर, संत आसाराम बापू, विवेकानंद केंद्र गायत्री परिवार, रामकृष्ण मिशन यांचे श्रद्धा जागरणाचे महत्व व कार्य सांगणारे स्टॉल उभे असेल.

श्री शबरी कुंभ २००६ च्या निमित्ताने दंडकारण्यात सम्मीलीत होणारा वनवासी समाज, धर्मजागरण व धर्म रक्षणाबरोबरच स्वावलंबनाचे धडे घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा व आपल्या समाजाला ही सक्षम बनविण्याचा संदेश घेऊन घरोघरी परतेल हा पू. सरसंघचालकांचा आशावाद सत्यात उतरेल ह्या विषयी शंकाच नाही.